# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. अनुराधा अमरेंद्र उकिडवे

---

गायन, वादन, नृत्य जेव्हा येतात या तीन कला एकत्र
आनंद, ऊर्जा, सकारात्मकता तेव्हा पसरते सर्वत्र

सा रे ग म प ध नी या सप्तसुरांनी नटते संगीत
त्यातूनच फुलून येतात अनेक राग, अनेक गीत

रागातील काही स्वर शुद्ध, काही तीव्र, तर काही कोमल
काही मुख्य तर काही वर्ज, त्यातून सजते सुंदर मैफल

संगीताचे व मानवाचे हे नाते आहे जन्मोजन्मीचे
संगीताशिवाय आयुष्य आहे कल्पनेपलीकडचे

डोहाळजेवण असो वा बारसे, लग्न असो वा सोहळे
आपले व संगीताचे असलेले असे हे नाते निराळे

संगीताला नसते वयाची अट, नसते भाषेची मर्यादा
भावपूर्ण रसपूर्ण आविष्काराने आनंद मिळतो सदा

तबल्यावरची थाप, बासरीचे सूर किंवा असेल जरी गाणारे व्हायोलिन
वाद्य कोणतेही असो, मनाला भिडले की ऐकणारे होतात तल्लीन

नृत्याची तर बातच निराळी, तेथे व्यक्त करायचे असतात फक्त भाव
हे भाव दुसऱ्यांच्या मनापर्यंत पोहचले की घेते सर्वांच्या मनाचा ठाव

संगीत म्हणजे लय, संगीत म्हणजे नाद, संगीत म्हणजे तान
कधीतरी नीट पहा निसर्गामध्ये देखील सापडेल संगीताची खाण

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

कुठे आगगाडीचा सूर असो वा कुठे रस्त्यावरून धावणारी मोटार
धकाधकीच्या जीवनात देखील दडलेले असतात सूर आणि ताल

कधीतरी निरव शांततेत वाऱ्याबरोबर होणारी पानांची सळसळ
पक्षांच्या किलबिलाटाबरोबर मिसळते झऱ्याची खळखळ

निसर्गाशी एकरूप होऊन, जुन्या परंपरा जपता जपता
नाविन्याची कास धरत, संगीत सजवूया सर्वांकरता...

Anahat Music Therapy